| MHKO110022412021 | **नियमित दिवाणी दावा क्र. २२६/२०२१ मधील निशाणी क्रमांक ४३ खाली आदेश**<br>**राहूल जयकुमार धनवडे वगैरे**<br>**विरुध्द**<br>**अशोक वसंत चौगुले वगैरे** |
|---|---|

प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी दाव्यामध्ये दुरुस्ती करणेसाठी दाखल केलेला आहे. प्रतिवादी यांनी त्यांचे म्हणणे अर्जामागे दिलेले असून सदरचा अर्ज मंजूर करणेस आक्षेप नोंदविला आहे.

**०२.** अभिलेखाचे अवलोकन केले. वादी व प्रतिवादी यांच्या विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकला.

**०३.** वादीतर्फे विधीज्ञ कथन करतात की, प्रस्तुत कामी वादी नं. २ श्रीमती हेलन वसंत चौगुले या दि. १८/०६/२०२५ रोजी मयत झाल्या आहेत. त्यांच्या वारसांना रेकॉर्डवरती घेणे न्यायाचे दृष्टीने आवश्यक आहे. याकरिता दाव्यामध्ये वादी नं. २ यांचे नावापुढे "मयत" असे नमूद करणे गरजेचे व आवश्यक आहे. सरदची दुरूस्ती फॉर्मल स्वरूपाची असून, वादीच्या दाव्यामध्ये कोणत्याही प्रकारचा बदल होणार नाही. सदरच्या दुरुस्तीमुळे प्रतिवादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. याउलट दाव्यास तांत्रीक बाबींची अडचण येणार नाही. सबब, सदरचा अर्ज मंजूर करणेची विनंती वादी यांनी केलेली आहे.

**०४.** प्रतिवादीतर्फे विधीज्ञ यांनी सदर अर्जावर म्हणणे दाखल करून अर्ज मंजूर करण्यास तीव्र आक्षेप नोंदविला परंतू न्यायाच्या दृष्टीने योग्य तो आदेश करण्याची विनंती केली.

**०५.** अभिलेखाचे अवलोकन केले असता, प्रथमदर्शनी असे दिसून येते की, प्रस्तुतचा दावा हा वादींनी प्रतिवादींचे विरूध्द वाटपासाठी व कायम मनाईसाठी दाखल

केलेला आहे. प्रस्तुतचे प्रकरणी मुद्दे काढलेले असून वारस रेकॉर्ड वर घेण्यासाठीचा विलंब माफ झाला आहे. तसेच अबेटमेंट सेट असाईडचा अर्ज मंजूर करण्यात आला आहे. प्रथमदशूनी अस दिसून येते की, इतर वादी व प्रतिवादी हे वादी क्र. २ चे कायदेशीर वारस असून ते आधीच रेकॉर्ड वर आहेत. त्यामुळे, वादी क्र. २ यांच्या नावापुढे मयत असे नमूद करण्यास काहीही हरकत नाही. सदरची दुरूस्ती ही फॉर्मल स्वरूपाची आहे. वादी नमुद करतात त्याप्रमाणे सदर दुरुस्तीमुळे मुळ दाव्याचे स्वरुपात कोणताही बदल होणार नाही. त्यामुळे वादी हा त्याच्या मुळ दाव्यात दुरुस्ती मागु शकतो. दावा गुणदोषावर चालून निकाली होणेसाठी व खरी परिस्थिती न्यायालयीन अभिलेखावर येण्याच्या दृष्टीने सदरची दुरूस्ती वादीने करणे आवश्यक आहे. दाव्यामध्ये दुरुस्ती केल्यास प्रतिवादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. त्यामुळे वरील बाबींचा विचार करता सदरचा अर्ज मंजूर करणे न्यायोचित होईल. सबब, खालील आदेश पारित करण्यात येतो-

## आदेश

| | |
|---|---|
| १. | प्रस्तुतचा निशाणी ४३ कडील अर्ज विनाखर्च मंजुर करणेत येत आहे. |
| २. | वादींना आदेशीत करणेत येतो की, वादी नं. २ श्रीमती हेलन वसंत चौगुले यांच्या नावापुढे " मयत " असे नमुद करण्यात यावे. सदरची दुरुस्ती आदेश पारित केल्यानंतर १४ दिवसांच्या आतमध्ये करणेची आहे. |
| ३. | वादी यांनी मुळ दाव्याची दुरुस्ती प्रत हजर करावी. |

sd/-

**दिनांकः- १३/११/२०२५.**
**पेठवडगाव**

**( आर. एस. मोरे )**
**३रे** सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
**पेठवडगाव**